# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ०५/१०/२०१८

## "जिल्हयात ३९ पोलीस कर्मचा–यांना पदोन्नती"

(६ सहाय्यक फौजदार, १३ पोलीस हवालदार आणि २० पोलीस नाईक पदावर पदोन्नत)

दिनांक १/१०/२०१८ रोजी श्रीमती विनीता साहू मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांनी जिल्हयात कार्यरत कर्मचा–यांना पदोन्नती बहाल केलेली आहे. याअंतर्गत ६ पोलीस हवालदार दर्जाचे कर्मचा–यांना सहाय्यक फौजदार या अधिकारी पदावर पदोन्नती दिली आहे. त्यामध्ये पोलीस हवालदार तुकाराम गभणे/७७०, लक्ष्मण चोपकर/५५६, अरुण गंथाळे/५८४, धनराज जगनाडे/५६४, राजेश पोहनकर/७३०, सिध्देश्वर थोटे/३१२ यांचा समावेश आहे. सहाय्यक फौजदार झाल्याने त्यांचे वेतनामध्ये वाढ झाली असुन सहाय्यक फौजदार म्हणुन त्यांना पोलीस तपासामध्ये अधिक अधिकार प्राप्त झालेले असुन पोलीस स्टेशनला दाखल होणारे गुन्हे आणि अनैसर्गीक मृत्यु यांचा तपास करणे, कारवाई मध्ये भाग घेणे अशा प्रकारचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

एकुण १३ पोलीस नाईक दर्जाच्या कर्मचा–यांना पोलीस हवालदार पदी बढती देण्यात आली आहे. त्यामध्ये पोलीस नाईक सुनिल भोवते/७९९, मंगल कुथे/२१५, टिकाराम कोरे/७२१, रमेश खोब्रागडे/८९१, दिनेश ठाकरे/७२२, तेजराम आस्वले/४५०, इरशाद खान/७२३, केशव चचाने/४९५, संजय वाकलकर/१९५, चंद्रमणी तभाणे/६६१, राजेश बांन्ते/१४८ राजेश पांडे/१८८, कांचन टेभुर्णे/९१३ यांचा समावेश आहे. पोलीस हवालदार म्हणुन त्यांचे वेतनामध्ये वाढ झाली असुन त्यांना विशेष वेतन ५००/–रु अधिक देण्यात येणार आहेत. पोलीस हवालदार म्हणुन त्यांना पोलीस तपासामध्ये आणखी अधिकार प्राप्त झाले असुन दखलपात्र गुन्हयांचा तपास करणे, प्रतिबंधक कारवाई करणे, अर्ज चौकशी करणे, बिट हवालदार म्हणुन जबाबदारी सांभाळणे, पोलीस निरीक्षकांनी नेमुण दिलेल्या कारवाई मध्ये भाग घेणे अशा प्रकारचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

जिल्हयात एकुण २० पोलीस शिपायांना पोलीस नाईक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सदर पदोन्नतीमुळे जिल्हयाला २० नविन तपासी अधिकारी मिळलेले आहेत. त्यामध्ये पोलीस शिपाई पुरुषोत्तम थेर/१४६, प्रकाश तांडेकर/११३८, रसीका कंगाले/१०३६, शिल्पा शेन्डे/१०१२, मिलींद गभणे/१०९३, माधुरी रामटेके/१०१५, श्रीकांत मस्के/१०९८, किशोर हटवार/१०७२, रामकृष्ण बावनकुळे/११३९, सतिश सिंगणजुडे/१०४६, इंद्रयाणी येलमुले/१०१६, प्रतीक बोरकर/११०१, अतुल रायपुरकर/१०७५, ईश्वर कडव/११११, घनश्याम कोडापे/१११०, प्रमोद टेकाम/१११४, हेमलता आकरे/१०१९, लक्ष्मी थोटे/१०२३, विनोद शिवनकर/१०९१, मंगेश सिंगनजुडे/१०९९ यांचा समावेश आहे. पोलीस नाईक म्हणुन त्यांचे वेतनामध्ये वाढ झाली असुन त्यांना विशेष वेतन

४८०/–रु अधिक देण्यात येणार आहेत. पोलीस नाईक म्हणुन त्यांना पोलीस तपासाचे अधिकार प्राप्त झालेले असुन त्यानुसार ते आता महाराष्ट्र दारुबंदी कायदा, महाराष्ट्र जुगार कायदा, भारतीय दंडविधानाचे काही महत्वाचे कलमे जसे उघडया जागेवरील चोरी, साधी दुखापत, हयगयीने वाहन चालविणे, जिवीतास अगर दुस–याच्या वैयक्तीक सुरक्षीततेस धोका पोहोचविणारे कृत्य करुण दुखापत पोहोचविणे, दोन किंवा तिन व्यक्ती मधील मारामारी, सुर्यास्त व सुर्यादया दरम्यान संशयास्पद स्थितीत सापडलेल्या व्यक्तीवर कारवाई करणे, ज्या मालमत्तेबाबत कोणतेही स्पष्टीकरण देता येत नाही अशी मालमत्ता ताब्यात असलेल्या व्यक्ती विरुध्द, तडीपार प्रकरणात परवानगी विना प्रतिबधीत स्थळी प्रवेश करणे, दारु पिवुन गैरशिस्त वर्तनुक करणे, सराईत गुन्हेगाराकडुन तारण घेणे ईत्यादी गुन्हयांचा तपास करु शकतो.

दिनांक २/१०/२०१८ रोजी स्वत: श्रीमती विनीता साहू, मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांनी पदोन्नती झालेल्या सर्व सहायक फौजदारांचे खांदयावर स्टार तसेच पोलीस हवालदार व पोलीस नाईक यांचे खांदयावर पद निदर्शक फिता चढवुन पदोन्नती बद्दल त्यांचे अभिनंदन केले व मिळालेल्या जबाबदारीचे भान ठेवत समाजाचे विकासाकरीता पोलीस म्हणुन पार पाडावयाच्या कर्तव्याची जाणीव करुन देत उत्कृष्ठ कामगिरी करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

पोलीस कर्मचा–यांची पदोन्नती झाल्याने कर्मचा–यामध्ये हर्षोल्लासाचे वातावरण निर्माण झालेले असुन ईतर कर्मचा–यांनाही लवकरच पदोन्नती होईल अशी आशा निर्माण झाली आहे. पदोन्नती झाल्याने पोलीस कर्मचारी व त्यांचे परिवारातर्फे श्रीमती विनीता साहू, मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

( जितेंद्र के. आडोळे )
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती
दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.